महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १७५ वे दिनांक : २०/०६/२०२६ वार : शनिवार

## हा तर दरोडा आहे, मर्दानगी नाही, खासदार फुटीवर वरुण सरदेसाईंचा संतप्त सवाल



**मुंबई** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील 6 खासदारांनी पक्षाचा 'व्हिप' झुगारून स्वतंत्र गट स्थापन केल्याची चर्चा सध्या राजकारणात चांगलीच तापली आहे. या सर्व घडामोडींवर ठाकरे गटाचे युवा नेते वरुण सरदेसाई यांनी अत्यंत संतप्त शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. "ज्या उद्धव ठाकरेंनी तुमच्यावर विश्वास ठेवला, त्यांनी तुम्हाला खासदार केलं नसतं, तर तुम्हाला कोणी विचारलं असतं का?" असा थेट सवाल करत सरदेसाई यांनी बंडखोर खासदारांवर आणि भाजपवर कडाडून हल्लाबोल केला. वांद्रे पूर्व येथे आयोजित एका कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी या राजकीय घडामोडींवर आपली रोखठोक भूमिका मांडली.

सरदेसाई म्हणाले की, गेले तीन दिवस आपण खासदार फुटीच्या ज्या चर्चा ऐकत आहोत, त्या अत्यंत घृणास्पद आणि दुर्दैवी आहेत. "या खासदारांना स्वतःला आरशात बघताना लाज वाटली पाहिजे. यांच्यासाठी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे भर उन्हात फिरले. एका विधानसभा क्षेत्रात 10-10 सभा घेतल्या. त्यामुळे या लोकांची निवडून येण्याची ताकद केवळ पक्षावरील निष्ठा आणि मातोश्रीवरील प्रेमामुळे होती. हे लोक इतके गोड बोलायचे की उद्धव साहेब त्यांच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवायचे. पण ते असा विश्वासघात करतील याची कुणालाच कल्पना नव्हती," अशी उद्विग्नता त्यांनी व्यक्त केली.

माध्यमांना उद्देशून सरदेसाई म्हणाले की, या 'ऑपरेशन टायगर' सारख्या गोष्टींना तुम्ही 'नॉर्मलाईज' करू नका. "एखाद्याच्या घरात दरोडा पडला तर दरोडेखोरांना पकडण्याऐवजी घरमालकाने कुलूप कसे लावले नाही, यावरच चर्चा होते. हा निव्वळ लोकशाहीवरील दरोडा आहे." भाजपवर टीका करताना ते म्हणाले, "तुमच्याकडे देशात आणि राज्यात मेजॉरिटी आहे. मोदींची सत्ता आहे, पण तरीही तुमचं पोट भरत नाही. केवळ एखादं बिल पारित करून घ्यायचं म्हणून लोकशाहीला तडे देण्याचं हे राजकारण जनता मान्य करणार नाही. सत्ताधाऱ्यांना 'भस्म्या' (हव्यास) नावाचा रोग जडला असून त्यावर त्यांनी उपचार करून घ्यावेत."

शिवसेना ठाकरे गट काँग्रेसमध्ये विलीन होणार आहे, या भीतीने आम्ही पक्ष सोडला, असा दावा काही बंडखोर करत आहेत (जसे की नितेश राणेंनी म्हटले आहे). यावर सरदेसाई यांनी कडक उत्तर दिले. ते म्हणाले, "हे अत्यंत हास्यास्पद आहे. ज्यांनी हा आरोप केलाय ते स्वतः काँग्रेसच्याच मुशीत तयार झाले आहेत. नितेश राणे स्वतः अनेक वर्षे काँग्रेसमध्ये होते. नागेश पाटील आष्टीकर, ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख हे सर्वजण कधीकाळी काँग्रेसमध्येच होते. आणि आता यांना अचानक काँग्रेसची अलर्जी कशी झाली?"

वरुण सरदेसाई यांनी या सर्व घडामोडींवर सावध पवित्रा घेताना स्पष्ट केले की, त्यांनी अद्याप लोकसभा अध्यक्षांना दिलेले पत्र किंवा त्यांचे मुख्यमंत्र्यांसोबतचे फोटो पाहिलेले नाहीत. "मी कुणाचेही नाव घेणार नाही. कारण मला आजही अपेक्षा आहे की त्यांच्या मनाचे परिवर्तन होऊ शकते. 'सुबह का भुला अगर शाम को घर आ जाये, तो उसे भुला नही कहते.' जर त्यांनी आपली चूक सुधारून पुन्हा पक्षात येण्याचा निर्णय घेतला, तर उद्धव ठाकरे साहेब त्याबाबत योग्य तो निर्णय घेतील," असे सांगत त्यांनी बंडखोरांना माघारी फिरण्याचे आवाहनही केले.

वरुण सरदेसाई यांच्या या प्रतिक्रियेवरून स्पष्ट होते की, ठाकरे गट या फुटीच्या घटनेमुळे कमालीचा संतप्त असला, तरी आजही ते काही खासदारांच्या 'घरवापसी'ची अपेक्षा ठेवून आहेत. तसेच, या फुटीमागे केवळ भाजपचा 'दोन तृतीयांश' बहुमताचा हव्यास कारणीभूत असल्याचे त्यांनी थेट अधोरेखित केले आहे.

## ठाकरेंची चूक, राऊतांची शिवराळ भाषा अन् शरद पवारांना ऑफर : रामदास आठवले



**मुंबई** : केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी वृत्तसंस्था 'एएनआय' (ANI) शी बोलताना महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणातील विविध वादळी मुद्द्यांवर अत्यंत रोखठोक आणि खळबळजनक प्रतिक्रिया दिली आहे. शिवसेना (उबाठा) गटातील संभाव्य फूट, संजय राऊत यांची भाषा, तृणमूल काँग्रेसमधील भूकंप, अजित पवारांचे अपूर्ण स्वप्न आणि प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व या सर्व प्रश्नांवर आठवलेंनी चौफेर टोलेबाजी केली. एएनआयशी (ANI) बोलताना त्यांनी या विषयावर आपली रोखठोक भूमिका मांडली.

"काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत जाणे हीच ठाकरेंची ऐतिहासिक चूक होती." उद्धव ठाकरे यांनी 2019 मध्ये महायुती सोडणे आणि महाविकास आघाडीत सामील होऊन काँग्रेस-राष्ट्रवादीशी हातमिळवणी करणे ही त्यांची सर्वात मोठी चूक होती, असे आठवले म्हणाले.

उद्धव ठाकरेंनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेच्या विरोधात जाऊन निर्णय घेतल्यामुळेच आज शिवसेना आणि खरे शिवसैनिक त्यांना सोडून जात आहेत. जर त्यांनी सुरुवातीपासूनच एनडीएसोबत युती ठेवली असती, तर आज ही वेळ आली नसती.

या फुटीर खासदारांनी महिला आरक्षण आणि परिसीमन विधेयकाला जाणीवपूर्वक विरोध करून महिलांवर अन्याय केला होता. आता संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात आमच्याकडे स्पष्ट बहुमत असेल, ज्यामुळे आम्ही हे विधेयक मंजूर करून महिलांना खऱ्या अर्थाने न्याय देऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिवसेना (उबाठा) पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्या विधानांवर बोलताना आठवले म्हणाले की, एवढ्या मोठ्या संख्येने खासदार सोडून गेल्यामुळे त्यांचा राग किंवा संताप आम्ही समजू शकतो. राग असला तरीही जाहीरपणे शिवराळ भाषा वापरणे किंवा शिव्या देणे ही चांगली गोष्ट नाही. संजय राऊत हे स्वतः राज्यसभेचे सन्माननीय खासदार आहेत. त्यामुळे त्यांनी अशा प्रकारची भाषा वापरणे अत्यंत अयोग्य असून, अशी भाषा वापरणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही, अशा शब्दांत त्यांनी राऊतांना सुनावले.

पश्चिम बंगालमधील राजकीय संकटावर बोलताना आठवलेंनी माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर थेट निशाणा साधला. ममता बॅनर्जी यांनी बंगालला 'सोन्याचा बंगाल' बनवण्याचे आश्वासन दिले होते, पण त्यांनी हा प्रदेश पूर्णपणे उद्ध्वस्त केला असून तिथे राजकीय गुन्हेगारी कमालीची वाढली आहे. ममता बॅनर्जी यांचे तब्बल 20 खासदार पक्ष सोडून बाहेर पडले असून ते 'एनसीपीआय' (NCPI) मध्ये सामील झाले आहेत. यामुळे संसदेत एनडीएचे संख्याबळ कमालीचे वाढले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व देशात आणखी मजबूत झाले आहे.

अजित पवारांच्या निधनाचा संदर्भ देत रामदास आठवले यांनी एक मोठा खुलासा केला. ते म्हणाले, "अजित पवार आज दुर्दैवाने आपल्यात नाहीत. जेव्हा महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका झाल्या, तेव्हा अजित पवार हे शरद पवारांसोबत गेले होते. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन राष्ट्रीय पातळीवर एनडीएला पाठिंबा देणार अशी चर्चा सुरू होती. मात्र, अजित पवारांच्या अकाली निधनामुळे हे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही."

अजित पवारांचे हे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी आता ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राष्ट्रीय पातळीवर एनडीएमध्ये सामील व्हावे, असे आवाहन आठवलेंनी केले. देशाच्या विकासासाठी काही काळापुरती विचारधारा बाजूला ठेवून शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास अजेंड्याला पाठिंबा द्यावा. हा निर्णय देश आणि त्यांच्या स्वतःच्या पक्षाच्या हिताचा ठरेल. तसेच, काँग्रेसमधील अनेक मोठे नेतेही लवकरच भाजपमध्ये प्रवेश करण्यास उत्सुक असल्याचा दावा त्यांनी केला.

भाजप आणि एनडीए मिळून छोट्या प्रादेशिक पक्षांना संपवत असल्याचा विरोधकांचा आरोप रामदास आठवलेंनी पूर्णपणे फेटाळून लावला. या आरोपात अजिबात तथ्य नसल्याचे त्यांनी सांगितले. आठवले म्हणाले की, "माझा रिपब्लिकन पक्ष (RPI) हा एक लहान प्रादेशिक पक्ष आहे. असे असूनही, एनडीएमध्ये सामील झाल्यापासून माझ्या पक्षाचा विस्तार तब्बल 28 राज्ये आणि 8 केंद्रशासित प्रदेशांमध्ये झाला आहे. नागालँड आणि मणिपूरसारख्या राज्यांमध्येही आमच्या पक्षाला अधिकृत मान्यता मिळाली आहे. त्यामुळे भाजप छोट्या पक्षांना संपवतो हा आरोप पूर्णपणे चुकीचा आहे."

सध्या देशातील राजकीय वातावरणात पक्षफुटी आणि प्रादेशिक पक्षांच्या अस्तित्वावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा संघर्ष सुरू आहे. अशा परिस्थितीत, एनडीएतील एका जुन्या आणि विश्वासू घटक पक्षाच्या नेत्याने दिलेले हे स्पष्टीकरण भाजपसाठी आणि महायुतीसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

## MBBS विद्यार्थ्यांकडून कथित बेकायदा फी वसुली



**मुंबई** : महाराष्ट्रातील एका खासगी वैद्यकीय महाविद्यालयाकडून एमबीबीएस विद्यार्थ्यांकडून कथितरीत्या बेकायदेशीर आणि अतिरिक्त फी वसुली करणे, विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे अडवून ठेवणे, आर्थिक व मानसिक छळ आणि नियामक संस्थांची कथित निष्क्रियता यासारख्या गंभीर आरोपांची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (NHRC) घेतली आहे.

या प्रकरणी आयोगाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (NMC), महाराष्ट्र शासनाचा वैद्यकीय शिक्षण विभाग आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून सविस्तर अहवाल मागवला आहे. हे प्रकरण सध्या आयोगाच्या विचाराधीन आहे.

डॉ. दिव्यांश द्विवेदी यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे सादर केलेल्या तक्रारींमध्ये आरोप केला आहे की, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, पुणे यांनी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (NMC) नियमांचे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचे आणि लागू शुल्क रचनेचे उल्लंघन करून एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना पाचव्या वर्षाची कथित बेकायदेशीर फी आकारली. तक्रारीत असाही आरोप आहे की, विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे अडवून ठेवण्यात आली, आर्थिक दबाव निर्माण केला गेला आणि यामुळे विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबियांना मानसिक आणि आर्थिक त्रासाला समोरे जावे लागले.

तक्रारदाराने आयोगाला हेदेखील अवगत केले की, विविध सरकारी आणि नियामक संस्थांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही प्रभावी कारवाई झाली नाही, ज्यामुळे हे प्रकरण शेवटी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे आणण्यात आले.

दरम्यान, याप्रकरणी आम्ही पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजचे संस्थाचालक, प्राचार्य आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.


06 एप्रिल 2026 रोजी पारित केलेल्या आदेशात, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने तक्रारीतील आरोपांचे परीक्षण केल्यानंतर म्हटले आहे की, प्रथमदर्शनी हे प्रकरण पीडित विद्यार्थ्यांच्या मानवाधिकारांच्या गंभीर उल्लंघनाशी संबंधित असल्याचे दिसून येते. आयोगाने विशेषतः बेकायदेशीर फी वसुली, विद्यार्थ्यांची कागदपत्रे अडवणे, आर्थिक व मानसिक शोषण आणि नियामक संस्थांची निष्क्रियता या आरोपांना गंभीर मानले आहे. याच आधारावर आयोगाने भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयायाच्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांना Action Taken Report - ATR सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० जून २०२६

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात पदवीदानाचा सोहळा; डॉ. आबासाहेब देशमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण



**अंबाजोगाई (प्रतिनिधी) :** येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करणारा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता उत्साहात संपन्न होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण टप्पा असलेल्या या समारंभात मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या परिश्रमांचा गौरव करणारा ठरणार आहे. उच्च शिक्षण, करिअर आणि सामाजिक जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन मिळणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.

या पदवीदान सोहळ्यास विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कु. वेदिका नागरेचे एमएचटी - सीइटी यश

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** मत्स्योदरी कनिष्ठ महाविद्यालय अंबड येथील बारावी विज्ञान वर्गातील विद्यार्थिनी कु. वेदिका मदनराव नागरे यांनी एम एच टी - सी ई टी पीसीएम ग्रुप मध्ये ९९.६३ गुणसंपादन करून महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद पंडित यांनी तिचा सत्कार केला. सोबत तिचे वडील प्रा. मदनराव नागरे ह्याच महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्र विभाग प्रमुख आहेत. सोबत तिची आई श्रीमती उषा नागरे आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व व शिक्षक तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. यापूर्वी एच एस सी बोर्ड फेब्रुवारी २०२६ परीक्षेमध्ये सुद्धा महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली होती.

तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक करणे सुरू आहे. पुढे सीओईपी मधून कम्प्युटर इंजीनियरिंग करण्याचे ध्येय तिने ठरविलेले आहे. या तिच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## एकल पालक व अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला एचएआरसीचा आधार



**जिंतुर (बी. डी. रामपूरकर) :** होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी), परभणी यांच्या शैक्षणिक पालकत्व उपक्रम २०२६ अंतर्गत जिंतूर तालुक्यातील ५५ एकल पालक व अनाथ विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वितरण करण्यात आले.शिवाजीनगर, जिंतूर येथील लक्ष्मी फंक्शन हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुंदरलाल सावजी जिंतूर अर्बन बँकेचे अध्यक्ष श्री. मुकुंद सावजी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. श्रीधर भोंबे उपस्थित होते. यावेळी एचएआरसीचे अध्यक्ष डॉ. पवन एस. चांडक, उपाध्यक्ष डॉ. शैलेश मंत्री, डॉ. सौ. आशा चांडक, वाचन चळवळ समन्वयक प्रकाश डूबे, संतोष बारबिंडे, संतोष माहुरकर, रेणुका देशमुख, तुकाराम काळे, अशोक शिंपले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश डूबे यांनी केले, तर सूत्रसंचालन सचिन हजारे यांनी केले.या उपक्रमाचा लाभ ताठापूर, चांदज, बेलखेडा, डोनवाडा, पुंगळा, पिंपरी, जिंतूर, संक्राळा, कोरवाडी, वझर, कुंभेफळ, मुरूमखेडा, केहाळ, निवळी, आसेगाव, वसा, येलदरी कॅम्प, केहाळ तांडा, निवळी खुर्द, बोरी आणि सांगळेवाडी येथील ५५ विद्यार्थ्यांना झाला. हे सर्व विद्यार्थी एकल पालक अथवा अनाथ असून त्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना शैक्षणिक साहित्याचे किट प्रदान करण्यात आले.वितरित करण्यात आलेल्या शैक्षणिक किटमध्ये शाळेची बॅग, वह्या, पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर, रंगपेटी, ड्रॉईंग बुक तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचा समावेश होता. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी, अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानाचा विस्तार व्हावा या उद्देशाने प्रत्येक विद्यार्थ्यास बालभारती प्रकाशित ‘किशोर’ मासिक भेट देण्यात आले.या उपक्रमासाठी समाजातील दात्यांनी उत्स्फूर्त आर्थिक सहकार्य केले. डॉ. सतीश पंचदार, सीए रोहित मंत्री, संतोष वट्टमवार, सीए सागर तोतला, पवन मुंदडा, प्रा. भूषण नाफाडे, विनायक कुंटे, सुनंदा ढाके, सतीश कुमार, वैशाली देशमुख आणि पूजा मुंदडा यांच्या योगदानामुळे विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्य पोहोचविणे शक्य झाले.यावेळी अध्यक्ष श्री. मुकुंद सावजी व प्रमुख अतिथी प्रा. श्रीधर भोंबे यांनी एचएआरसीतर्फे एकल पालक व अनाथ विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे शैक्षणिक पालकत्व, वाचनसंस्कृती संवर्धन व विविध सामाजिक उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय असल्याचे सांगून संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एचएआरसीचे पदाधिकारी, वाचन चळवळीचे कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच स्थानिक सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० जून २०२६


## फुलांचा राजा

किती मनमोहक
गुलाबाचे फूल
रूप त्याचे देखणे
मनास पडे भूल

सकाळी सकाळी
बागेत भेटतो
हवाहवासा
सर्वांना वाटतो

दुःख विसरून
काट्यातही फुलतो
मंद हवेत
आनंदाने डुलतो

सुगंध त्याचा
चौफेर दरवळे
त्याला पाहताक्षणी
दुःख दूर पळे

फुलांचा हा राजा
मोठा भारी रूबाब
विविध फुलांमध्ये
खुलून दिसतो गुलाब



- **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## आता ढग फुटू दे बाबा

पेपर फुटले, आमदार फुटले, खासदार फुटले सारे,
आता ढग फुटू दे बाबा, शेतकरी झाले बिचारे.

सत्तेच्या या खेळामध्ये, किती चेहरे फुटले,
स्वार्थाच्या बाजारामध्ये, किती मुखवटे तुटले.

आश्वासनांचे ढीग लागले, शब्द हवेत विरले,
पावसाअभावी मात्र शेतकरी, चिंतेमध्ये झुरले.

कोरड्या पडल्या विहिरी, कोरडे झाले झरे,
आभाळाकडे पाहत बसले, शेतकरी सारे.

पेपर फुटले म्हणून कुणाचे, भविष्य अंधारले,
पावसाअभावी शेतकऱ्यांचे, आयुष्यच होरपळले.

फुटले पक्ष, फुटली मने, फुटले सत्तेचे तारे,
आता ढग फुटू दे बाबा, भरू दे शिवार सारे.

भेगा पडल्या मातीत आता, करपून गेले वारे,
एक सरीची आस धरुनी, उभे शेतकरी सारे.

राजकारणाच्या गोंधळाने, देश पुरता थकला रे,
पावसाच्या एका सरीने, शेतकरी पुन्हा फुलतो रे.

हिरवी चादर पांघरू दे, डोंगर-दऱ्या सारे,
सुखाचे दिवस येऊ देत, शेतकरी झाले बिचारे...!

पेपर फुटले, आमदार फुटले, खासदार फुटले सारे..
आता ढग फुटू बाबा शेतकरी झाले बिचारे....



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## तुम्ही स्वतःला निर्लज्जपणे विकले!:महाराष्ट्र हे घाणेरडे राजकारण सहन करणार नाही, आदित्य ठाकरे



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गट पुन्हा एकदा मोठ्या फुटीच्या उंबरठ्यावर असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने राबवलेल्या 'ऑपरेशन टायगर'मुळे ठाकरे गटाचे ६ खासदार फुटल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. या संभाव्य बंडाच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून अधिकृत व्हिप जारी करण्यात आला होता. मात्र असे असूनही या ६ पैकी एकाही खासदाराने पक्षाच्या संसदीय दलाच्या बैठकीला हजेरी लावली नाही. बैठकीकडे फिरवलेल्या या पाठामुळे सदर खासदार फुटल्याचे आता जवळपास निश्चित मानले जात असून, यावर आता आमदार आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे.

आदित्य ठाकरे यांनी ट्विट करत म्हटले की, पुन्हा एकदा आपण घाणेरड्या राजकारणाचे विदारक उदाहरण पाहत आहोत. एहसान फरामोश आणि विकाऊ अशा सडक्या वृत्तीचे हे काही ठराविक व्यक्ती २०२४ मध्ये ज्यांच्यामुळे जिंकून आले, त्यांनाच दगा देत आहेत. कितीही कारणे द्या... सत्य एकच आहे. तुम्ही स्वतःला निर्लज्जपणे विकले आहे. स्वतःला तर विकलेच, पण त्यासोबत तुमची प्रतिष्ठा, तुमचे नाव आणि तुमच्या कुटुंबाचे नावही पणाला लावले आहे, असा हल्लाबोल ठाकरे यांनी केला आहे.

महाराष्ट्र हे घाणेरडे राजकारण सहन करणार नाही... मुळीच नाही! ह्या काळोखात प्रकाश देणार ती फक्त आणि फक्त आपली मशाल, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

यापूर्वी आदित्य ठाकरे यांनी पक्षात सर्व खासदार आपल्यासोबत असून आमचा आमच्या खासदारांवर अंधविश्वास असल्याचे म्हटले होते. मात्र त्यांचा अंधविश्वासानेच त्यांचा विश्वासघात केल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

शिवसेनेत फूट पडली नसून बंडखोर खासदारांनी स्वतःला विकल्याची टीका संजय राऊतांनी माध्यमांशी बोलताना केली. मी शिवसेनेत ही फूट झाली असे मानत नाही. माणूस विचारांशी बांधीलकी दाखवून फुटतो. एखाद्याने स्वतःला बाजारात विकण्यासाठी उभे केले आणि कुणी खरेदी केले तर त्याला फुटणे म्हणत नाही. त्याला विकणे म्हणतात. तसे आमचे ६ लोक दोन दिवसांपूर्वी बाजारात उभे राहिले. त्यांनी स्वतःची बोली लावली आणि त्या बोलीवर त्यांना विकत घेतले गेले. कोणताही महान विचार घेऊन ते फुटलेले नाहीत, अशी सडेतोड टीका राऊत यांनी केली आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी /१२ वी पास

SANITARY HEALTH INSPECTOR
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी /१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : Any B.Sc.

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc
(Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी, १२ वी पास

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

DIALYSIS TECHNICIAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी / १२ वी पास

O.T.TECHINICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी १२ वी पास

ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० जून २०२६


## मराठी 'बालभारती' इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकात रोहन बहिर व प्राचार्य केशव भांगे यांचा समावेश..



**शिरूर कासार :** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. यांनी चालू शैक्षणिक वर्ष २९२६-२७ पासून शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे,नव्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार मराठी 'बालभारती' इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकात,लेखक दिलीप फलटणकर यांच्या "धाडसी रोहन" या पाठाचा समावेश केला आहे.बीड जिल्ह्यातील राजुरी (नवगण)येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या चिं.रोहन रामचंद्र बहिर या विद्यार्थ्यांने गावातील दुथडी वाहणाऱ्या नदीच्या मोठा पुरात,धुणे धुतांना वाहून जाणाऱ्या'छायाबाई गायकवाड'या महिलेचे प्राण वाचविले. त्याने दाखविलेल्या धाडसाचे, शौर्याचे, साहस आणि प्रसंगावधान या शाश्वत गुणाचे कौतुक म्हणून,रोहन शिकत असलेल्या 'गजानन महाविद्यालयाचे तत्कालीन'प्राचार्य केशव भांगे साहेब'यांनी विद्यालयात,रोहनचा भव्य सत्कार करून त्याच्या शौर्याचे व धाडसाचे कौतुक केले.तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,माजी कॅबिनेट मंत्री जयदत्त(अण्णा) क्षीरसागर साहेबांनी चिं.रोहन बहिर आपल्या जन्मभूमीतील व शिक्षण संस्थेतील विद्यार्थी असल्याने, त्याचा हृदय सत्कार व कौतुक करून त्याच्याबद्दल अभिमान व्यक्त केला.बीड जिल्ह्यातील वृत्तपत्रात रोहनची फोटो सहित बातमी प्रकाशित झाली.रोहनच्या शौर्याची माहिती संपूर्ण देशाला व्हावी म्हणून माननीय जयदत्त(अण्णा)क्षीरसागर साहेब,व प्राचार्य केशव भांगे सर,यांनी शासकीय पातळीवर पाठपुरावा केला.त्यामुळे सन-२०२३ ला देशाचे 'पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब'यांच्या हस्ते,चिं.रोहन रामचंद्र बहिर,या विद्यार्थ्याला विधानभवनात,"पंतप्रधान राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार"प्रदान करण्यात आला. ही विशेष बाब म्हणून मराठी'बालभारती'इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकातील बाराव्या प्रकरणात राजुरी (नवगण) येथील गजानन विद्यालयाचा विद्यार्थी,रोहन रामचंद्र बहिर व तत्कालीन प्राचार्य केशव भांगे साहेब यांचाही समावेश झाला आहे.तेव्हा बीड जिल्ह्याचा, धाडसी रोहनच्या पराक्रमाचा व त्याच्या कौतुकाचा महाराष्ट्रातील सर्व शाळेतील इयत्ता सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागणार आहे.ही बाब बीड जिल्ह्यासाठी भाषणावह आहे.

## जयंती उत्सवाला सामाजिकतेची जोड; महालिंगरायवाडीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट



**(मुरुम, प्रा. सुधीर पंचगल्ले) उमरगा :** तालुक्यातील महालिंगरायवाडी येथे छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव समितीच्या वतीने छत्रपती संभाजीराजे जयंतीनिमित्त उरलेल्या निधीतून राबविण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. बुधवारी (दि. 17) रोजी शाळेच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कंपासपेटी व त्यातील आवश्यक साहित्य तसेच शाळा सुरू झाल्याच्या निमित्ताने खाऊचेही वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान सोमवंशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक ईश्वर नांगरे, उपसरपंच शाहूराज जाधव, प्रमुख व्याख्याते लखन भोंडवे, पत्रकार तथा इतिहास अभ्यासक मोहन जाधव, आनंद बागल, उपाध्यक्षा वसुधा चव्हाण, शिक्षणप्रेमी चंदाराणी घोरपडे, समिती सदस्य गोविंद भुसार, उत्सव समितीचे उपाध्यक्ष अमित जाधव, सचिव अर्जुन चव्हाण, किशोर रामतीर्थ आदी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीराजे व राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. यावेळी प्रमुख व्याख्याते लखन भोंडवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या पिढीने महापुरुषांच्या विचारांचा वारसा जतन करणे ही काळाची गरज आहे. अराजकता, स्वार्थ आणि मूल्यांचा ऱ्हास होत असलेल्या काळात छत्रपती संभाजी महाराजांसारख्या राष्ट्रपुरुषांचे विचारच समाजाला योग्य दिशा देऊ शकतात. शंभूराजेंचा दैदीप्यमान, शौर्यशाली आणि त्यागमय इतिहास हा तरुणांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत या साहित्याचा सदुपयोग करून स्वतःचे भविष्य घडवावे. उत्सव साजरा करण्याबरोबरच समाजाप्रती बांधिलकी जपणाऱ्या समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले पाहिजे. पत्रकार तथा इतिहास अभ्यासक मोहन जाधव यांनी प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आज अनेक उत्सव समित्या विविध उपक्रम राबवित असल्या तरी समाजोपयोगी कार्यातून वेगळेपण सिद्ध करणारे उपक्रम दुर्मिळ होत चालले आहेत. अशा परिस्थितीत छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव समितीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून शिक्षण क्षेत्राशी असलेली आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली आहे. हा उपक्रम इतर संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे.यावेळी बालाजी जाधव, बालाजी भालेराव, रब्बानी मुल्ला, निर्मला यादव, निर्मला भोसले यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन बालाजी भालेराव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश सोमवंशी, हिराजी पवार, बालाजी सोमवंशी, राम घोरपडे, बालाजी घोरपडे, शुभम घोरपडे, बालाजी विनायक घोरपडे, विवेक जाधव, हरी घाडगे, मंथन चव्हाण, आकाश जाधव, शुभम जाधव आदींनी विशेष परिश्रम घेतले.

